साधन संपत्ती निर्धारण व आधार सामग्री विकास घटक या योजनेत्तर योजनेखालील २ अस्थायी पदे सन २०१९-२० मध्ये पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :-एफडीएम २०१९/प्र.क्र.२९/फ-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ०३ एप्रिल, २०१९

वाचावे :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-३/ योजनेत्तर/ प्र.क्र.१८ /१८-१९/२१८१, दि. २८.०२.२०१९
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. एफडीएम-२०१८/प्र.क्र.१६/फ-२, दि.२०.१०.२०१८.
३) शासन निर्णय,वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक,दि.२१.०२.२०१९

शासन निर्णय :-

साधन संपत्ती निर्धारण व आधार सामग्री विकास या योजनेत्तर योजनेतंर्गत २ अस्थायी पदांना वरील दि. २०.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.०१.१०.२०१८ ते २८.०२.२०१९ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात आली होती. सदर पदांची मुदत दि.२८.०२.२०१९ रोजी संपुष्टात आली आहे. त्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.१ येथिल दि.२८.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सन २०१९-२० मध्ये सदर २ अस्थायी पदांना दि. ०१.०३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० पर्यंत पुढे चालू ठेवण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर केला आहे.

त्याअनुषंगाने खालील विवरणपत्रात दर्शविलेली २ अस्थायी पदे वन विभागाच्या मंजूर आकृतीबंधात समाविष्ट असल्याने या २ अस्थायी पदांना वित्त विभागाच्या संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णय दि.२१.०२.२०१९ च्या अधिन राहून दि.०१.०३.२०१९ ते ३०.०९.२०१९ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

पदनाम	पदसंख्या
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (नियोजन व व्यवस्थापन-वन्यजीव)	१
विभागीय वनअधिकारी (डाटाबेस)	१
एकूण	**२**

२. या पदांवर होणार खर्च होणारा खर्च "प्रधान शीर्ष -२४०६-वनीकरण व वन्यजीवन (योजनेत्तर) ०१ वनीकरण १०१ वनसंधारण विकास व पुनर्निर्मिती (०४) (०१) कार्य आयोजनेची सुधारणा व तयारी (२४०६ ०१४९)" या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१९-२० या वर्षी त्याखालील मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. प्रस्तुत शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन निर्णय,वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/ प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१.०२.२०१९ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४०४१०५७३१३६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.04.04 10:59:24 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रतिलिपी :- १) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व)
४) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
५) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) वित्त विभाग, व्यय १०/अर्थसंकल्प-४/ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७) कार्यासन अधिकारी, ब-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय मुबई - ३२.
८) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.